मुंबई पोर्ट ट्रस्ट
सामान्य प्रशासन विभाग - कल्याण प्रभाग

क्र. साप्रवि-कप्र/आरटीआय/2009 दि. 03.09.2018

प्रति
श्री. चंद्रकांत धोंडू लाकडे,
13/4, दाऊद दुधवाला इमारत,
दुसरी सुतार गल्ली,
डॉकयार्ड रोड, माझगांव,
मुंबई -400 010.

**विषय : माहिती अधिकार अधिनियम 2005**
**संदर्भ : श्री. रा.एस. चाळके, उप व्यवस्थापक (दू.सं./इलेक्ट्रॉ.)व केंद्रीय जन माहिती अधिकारी (सामान्य प्रशासन विभाग) यांनी पाठविलेला आपला 10.8.2018 चा अर्ज.**

महोदय,

आपला माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या अंतर्गत दि. 10.8.2018 चा अर्ज या कार्यालयात दि. 20.8.2018 रोजी प्राप्त झाला. या अर्जाद्वारे मागितलेली माहिती खालीलप्रमाणे :

परिच्छेद 3-(एक)(अ) :

निवृत्ती नंतर मिळकतीच्या 40% दराने भाडे वसूली संबंधीचा नियम खालीलप्रमाणे-

सचिव यांच्या दि. 19.8.1983 च्या पत्र क्र. E/GEE-G/2542 नुसार सेवानिवृत्तीच्या सहा महिन्यानंतर एकूण मानक भाडयाच्या (Pooled Standard Rent) दुप्पट रक्कम (1978 च्या न्यासी संकल्प संख्या 264 द्वारे )किंवा कर्मचा-याच्या अंतिम वेतनाच्या 40% रक्कम यापैकी जी रक्कम जास्त असेल त्या दराने भाडे वसूल करण्यात येते. (प्रत संलग्न)

(ब) मुंबई बंदरातील जवाहरद्वीप येथील पाचव्या ऑईल बर्थ प्रकल्पासाठी कार्यरत ठेकेदार सर्वश्री. आयटीडी सिमेंटेशन लिमिटेड यांच्या कामगार व कर्मचा-यांच्या निवासासाठी नाडकर्णी पार्क मधील बिल्डिंग नं 42, तृतीय श्रेणी रिक्त निवास वेळोवेळी वितरित करण्यात यावेत अशी विनंती सक्षम प्राधिका-यांच्या संमतीने मुख्य अभियंता यांनी केली आहे. त्याप्रमाणे मुख्य अभियंता ना सदर निवास सर्वश्री आयटीडी सेमेंटेशन मर्यादित यांना वितरित करण्याकरिता हस्तांतरित केले आहेत. भाडे, अनामत रक्कम विषयीची सविस्तर माहिती स्थापत्य अभियांत्रिकी विभागाकडे उपलब्ध आहे. त्या करीता आपल्या अर्जाची प्रत स्थापत्य अभियांत्रिकी विभागाकडे पाठविण्यात येत आहे.

(क) मान्यताप्राप्त युनियनच्या पदाधिका-यांना मुंबई पोर्ट ट्रस्ट च्या 2007 चा न्यासी संकल्प क्र.163 व 2009 चा न्यासी संकल्प क्र. 36 नुसार निवास वितरित केले आहेत.

परिच्छेद 3-(एक) 3) वीजबिला संबंधी माहिती मुख्य यांत्रिकी अभियंता विभागाकडे तसेच व्याजासंबंधीची माहिती अर्थ विभागाच्या अखत्यारित येते. म्हणून आपला अर्ज मुख्य यांत्रिकी अभियंता विभाग व अर्थ विभाग यांच्याकडे आवश्यक कारवाई करीता पाठविण्यात येत आहे.

2. वरील माहितीने समाधान न झाल्यास आपण मा. श्रीमती एस.जी. पटवर्धन, वरिष्ठ उप सचिव व प्रथम अपीलीय प्राधिकारी, सामान्य प्रशासन विभाग, मुंबई पोर्ट ट्रस्ट, पोर्ट भवन, 2रा मजला, शूरजी वल्लभदास मार्ग, बॅलार्ड इस्टेट, मुंबई -400001 यांच्याकडे हे उत्तर मिळाल्यापासून 30 दिवसाच्या आत अपील करु शकता. अपील फॉर्मेट संलग्न.

आपला विश्वासू,

संलग्नः यथोक्त

(आर. के. रामगुडे)
वरिष्ठ कल्याण अधिकारी आणि
केन्द्रीय जनसूचना अधिकारी
कल्याण प्रभाग

प्रत : श्री. एस. बी. लागवणकर, अधिक्षक अभियंता (आर आर वाय) आणि केंद्रीय जनसूचना अधिकारी स्थापत्य अभियांत्रिकी विभाग - मुद्दा क्र. 3 (एक) (ब) ची माहिती देण्यात यावी.

प्रत : श्री. एम. ए. तरईकर, उप मुख्य यांत्रिकी अभियंता (MMED) आणि केंद्रीय जनसूचना अधिकारी, मुख्य यांत्रिकी अभियंता (MMED) विभाग - मुद्दा क्र. 3 (एक) 3 - वीजबिलासंबंधी माहिती देण्यात यावी.

प्रत : श्रीमती एन. एन. परब, वरिष्ठ लेखा अधिकारी, आणि केंद्रीय जनसूचना अधिकारी, अर्थ विभाग - मुद्दा क्र. 3(एक) 3 - व्याजा संबंधी माहिती देण्यात यावी.

श्री. चंद्रकांत धोंडू लाकडे यांनी मागितलेली उपरोक्त माहिती आपल्या विभागाच्या अखत्यारित येत असल्यामुळे त्यांचा माहिती अधिकारा अंतर्गत प्राप्त अर्ज पुढील आवश्यक कारवाईसाठी पाठविण्यात येत आहे. अर्जात मागितलेली माहिती परस्पर देण्यात यावी ही विनंती

संलग्न : अर्ज

(आर. के. रामगुडे)
वरिष्ठ कल्याण अधिकारी आणि
केन्द्रीय जनसूचना अधिकारी
कल्याण प्रभाग